म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र. 2532

2532

IRBK-0102532
IRBK-0102532

# शेतकऱ्याचे मूल

# शेतकऱ्याचीं मुलं



म. ग्रं. सं. ठाणें
विषय बाल वाङ्मय
अ. नं. १८१

पर्ल बक

IRBK-0102532
IRBK-0102532

दा. क्र. 2532

किशोर साहित्य ३०

वा. क्र. ........ नों. दि. ........
वि. ........

# शेतकऱ्यांची मुलं

★

2532
20-2-69

लेखिका

पर्ल बक

अनुवादक

दीनानाथ म्हात्रे

★

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई.

मित्रवर्य रंगा मराठे यास

प्रेमादरपूर्वक—

**किंमत ५ आणे**

प्रथमावृत्ति १९४६—सर्व हक्क प्रकाशकाधीन.

प्रकाशकः—**शंकर वामन कुलकर्णी**, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई, ४.

मुद्रकः—**जयराम दिपाजी देसाई**, राष्ट्रवैभव प्रेस, गिरगांव मुंबई, ४.

# शेतकऱ्यांची मुलं

आज शनिवारचा दिवस होता. अभ्यास आटपून प्रभा, मधु, विनु आणि बेबी बाहेर खेळत होती. खूप खूप खेळले होते ते आज. विनु तर फार दमला होता. चिमणीएवढं तोंड करून तो म्हणाला 'अे बेबी, मधु, प्रभा! मला भूक लागली आहे. आतां खेळ बंद करूया !' त्याचे ते शब्द ऐकून मधु, प्रभा, आणि बेबी मोठमोठ्यानें हसूं लागलीं. विनु बिचारा हिरमुसला पण एवढ्यांत आईनेंच त्यांना हाक मारिली. आणि तीं सारीजणं धांवतच घरांत आलीं.

बाबा पण त्यांचीच वाट पहात होते. सगळीजणं जेवायला बसली. आई हंसत होती. मुलांना कळेना. आई हंसते कां ? मग बाबा म्हणाले. 'काल आईनें तुम्हांला चिनी गोष्ट सांगितली ना ?'

हो. लाडका भाऊ! फार छान होती बाबा! बेबी म्हणाली.

हं. मग आज आईनें चिनी पद्धतीचेंहि जेवण केलं आहे." बाबा म्हणाले.

चारी भावंडें एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागलीं.

" अरे असे एकमेकांच्या तोंडाकडें काय पाहतां ?" आई म्हणाली. हं करा सुरवात जेवायला.

"पण ह्या काड्या कशाला बोरूसारख्या ?" बेबीनें विचारलं. छान...! म्हणजे रात्रींची गोष्ट तुम्हीं एवढ्यांत विसरलात ना ?

म्हणजे ह्या काड्यांचा आणि रात्रींच्या गोष्टीचा काय संबंध ? प्रभा म्हणाला.

चिनी लोक चॉपस्टिकस्‌नं भात खातात म्हणून नाहीं कां मी सांगितलं !

हं हं! विनु मोठ्यानं हंसून म्हणाला. मग जेवा-यला सुरवात झाली. पण त्या बोरूसारख्या दोन काड्यांनीं मुलांना आज जेवण कांहीं जमेना. आईला हसूं येऊं लागलं. मग तिनं सर्वांना चॉपस्टिकस् कशा धरायच्या तें समजावून सांगितलं.

मुलं जेवूं लागलीं. आईनें केलेले सर्व पदार्थ

त्यांना फार आवडले.

' पण आई तुला हे पदार्थ करायला कुणी ग शिकवलं ? मधुनें विचारलं. कुणी म्हणजे ? रात्रीं मी तुम्हांला सांगितलं नाहीं, कीं मीं लहानपणीं चीन-मध्यें होते. चिनी मुलंमुली माझ्या मित्र-मैत्रीणी होत्या.

" आई, मग तुला कोणचीं चिनी मुलं जास्त आवडायचीं ? बेबीनं विचारलं. आईनं जरा विचार केला आणि ती म्हणाली—" मला ! आमच्या शेजारी दोन शेतकऱ्यांचीं मुलं होतीं. तीं फार आवडायचीं. "

कां ? विनुनें विचारलं.!

का ? आई हंसून म्हणाली. त्यांच्याजवळ एक पाणरेडा होता.

पाणरेडा ! बेबी आश्चर्यानें म्हणाली.

' मग आम्हांला आज पाणरेड्याची गोष्ट सांग ' प्रभा म्हणाला, कारण त्याला प्राण्यांच्या गोष्टी ऐकायला फार आवडत.

आईनें सुरवात केली—" पाणरेडा म्हणजे फार विलक्षण प्राणी आहे. तो आपल्या बैलासारखा दिसतो.

कारण त्याच्या शरिराचा आकार हुबेहुब बैलासारखा असतो.

'मग पाणबैल कां म्हणू नये त्याला ? मधुनें विचारलें. " पाणबैल त्याल। म्हणतां येत नाहीं. कारण त्याचीं शिंगं फार रुंद आणि लांब असतात. त्याच्या अंगावरची चामडी काळी आणि फार जाड असते. आणि पाणघोड्याप्रमाणें ह्याला पाण्यांत डुंबायला आवडतं. शिवाय चीनमध्यें शेतकरी लोक पाणरेड्याला नांगराला जुंपतात.

पाणरेड्याला नांगराला जुंपतात ? प्रभानें विचारलें. " हो त्यांत काय आश्चर्य आहे ? चीनमध्यें सर्वच शेतकरी पाणरेड्यांचा शेतं नांगरण्याकरितां उपयोग करतात. हं, तेव्हां मी तुम्हांला गोष्ट सांगत होतें नाहीं ? त्या शेतकऱ्यांच्या पाणरेड्याचं नांव होतं दालोबो ! दालोबो फार मंद होता. हळूहळू चालायचा. इतका हळू चालायचा कीं, आपल्या मुंग्यासुद्धां त्याच्यापेक्षां जलद चालत असतील. त्या शेतकऱ्याचं नांव होतं चँग. चँग दालोबोवर रागवायचा. कारण दालोबोच्या मंदपणाचा

त्याला आतिशय राग येई आणि म्हणूनच चँगनीं त्याचं नांव ठेवलं होतं दालोबो. ”

मधू मध्येंच म्हणाला. ‘ आई, मी शाळेंतल्या कुणा-तरी मुलाला ‘ दालोबो ’ अशी हाक मारीन ”—

“ हं. मधू पुढें गोष्ट ऐकायची आहे ! ना असं म्हणून आईनें पुढें गोष्ट चालू केली.

“ पहिल्या दिवशीं मी दालोबोला पाहिला तो दिवस मला अजून आठवतो. आई घरांत काम करीत होती. मी माझा अभ्यास केला आणि माझं गोष्टीचं पुस्तक घेऊन बाहेर निघाले. दूरवर माझी एक छानशी जागा होती. मला ती फार आवडे. दररोज माझं गोष्टीचं पुस्तक घेऊन मी तिथें वाचीत बसे. तिथें गवत फार उंच उंच वाढलेलं होतं. आणि माझी बसण्याची जागा अशी होती कीं, मला तिथून सर्व दिसे. पण मी मात्र कुणाला दिसत नसे. मी माझं पुस्तक उघडलं आणि ‘ अल्लाउद्दीन व जादूचा दिवा ’ ही गोष्ट वाचायला सुरवात केली. तो दिवस कसा छान होता. सूर्याचा प्रकाश मंद होता. बाजूच्या गवताचा मधुर वास वाऱ्या-

बरोबर येत होता. आणि शेजारच्या दरींत पक्ष्यांची गोड किलबील चालू होती. फार थंडी नव्हती, फार उष्माही होत नव्हता. मी अगदी आनंदानें गोष्ट वाचूं लागले. ' अल्लाउद्दीनला जादूचा दिवा मिळाला. मग राजकन्या मिळाली. त्यानं राजकन्येबरोबर लग्न केलं आणि तो सुखानें राहूं लागला.' गोष्ट संपली होती. पुढची गोष्ट मी वाचायला घेतली नाहीं. पुस्तक बाजूला ठेवून मी गवतांत पडले आणि आकाशांकडे पाहूं लागले. माझ्या मनांत विचार येत होते. " अल्लाउद्दीनसारखा मला जादूचा दिवा सापडला तर काय मौज होईल ?" माझ्या सभोवार उंच गवत वाऱ्यावर डुलत होतं. दुसरं कुणीच नव्हतं तिथं. इतक्यांत माझी नजर बाजूला वळली. एक पांढरा दगड मला दिसला. मी तो उचलला. माझ्या मनात आलं, हा जादूचा तर दगड नसेल? कारण इतर दगडापेक्षां हा निराळा होता. मला वाटलं, अल्लाउद्दीन जसा जादूचा दिवा जमिनीवर घासायचा तसा हा जमिनीवर घासावा.

मग पुढें काय झालं ? प्रभानें अधिर होऊन विचारलें. त्याचे डोळे एवढाले झाले होते.

'मी तो जमिनीवर घासला आणि म्हटलं---' जादू-मंतर फू ऽऽ'

आईनें सर्वांच्या तोंडाकडे पाहिलें. बाबा बाजूला 'वर्तमानपत्र' वाचीत बसले होते. त्यांनीं सुद्दां ते बाजूला ठेवलें.

' आणि कांहींतरी झालं. माझ्या समोरचं गवत जोरजोरानें हलूं लागलं. कुणाचे तरी चार जाडे जाडे आणि काळे पाय दिसूं लागले. हळू हळू ते जवळ जवळ येऊ लागले. माझी अगदी तिरपिट उडली. छांती जोरजोरानें धडधडू लागली. पण दुसऱ्याच क्षणाला माझ्या समोर लांब शिंग असलेला पाणरेडा उभा राहिला. त्याच्या नाकांत एक मोठी कडी अडकवली होती. आणि कडींतून दोरी ओवून ती त्याच्या गळ्यांत बांधली होती. मी मोठ्यानें किंकाळी मारून उभी राहिलें. कारण त्याचं तें भलं मोठं तोंड, आणि शिंग पाहून माझ्या छातींत धडकीच भरली. पण त्याच्या पाठीवर



दोन मुलं बसलीं होतीं. एक मुलगी होती आणि दुसरा मुलगा. त्यांना पाहून मात्र माझी भीति पार पळाली."

त्या मुलानं मला विचारलं—" तूं त्या टेकडीवरच्या घरांत राहतेस ना ? तुम्हीं परदेशांतून इथं आला आहांत ना ?

मी म्हटलं—‘ होय !’

“ त्यांनीं तुला परदेशांतून आली आहेस असं कां विचारलं ” मधु म्हणाला.

“ कां म्हणजे तो चिनी मुलगा होता. एखादा चिनी मुलगा इथं आला तर आपण त्याला हिंदी मनुष्य म्हणूं कां ? तसेंच त्यानं मला विचारलं. मग मी त्याला विचारलं ‘ तूं कोण ? ती मुलगी त्याची बहीण होती. आणि त्यानं पाणरेड्याकडे बोट दाखवून म्हटलं-ह्याचं नांव ‘ दालोबो ’. फार मंद आहे हा आणि म्हणून आम्ही ह्याचं नांव ‘ दालोबो ’ ठेवलं आहे.

त्याची बहीण त्याच्या पाठीमागं बसली होती. ती कांहींच बोलत नव्हती. त्याच्या कमरेला तिनं आपल्या हाताचा विळखा घातला होता. ती फार सुंदर होती. तिचा चेहरा गोंडस होता. केसांची तिनं वेणी घातली होती आणि तिचे डोळे कसे काळेभोर होते आणि आमच्या गोष्टी ऐकतांना तिनं चटकन तोंड उघडलं तेव्हां तिचे दांत मला दिसले. पांढऱ्याशुभ्र तांदळाच्या दाण्यासारखे होते ते. दालोबोची पाठ एवढी रुंद होती

कीं, त्या दोघा बहीण--भावंडांचे पाय त्याच्या पाठीवर लोंबकळत होते. आम्हीं गोष्टी करण्यांत गुंग झालों असं पाहून दालोबो बाजूला जाऊन चरूं लागला. मग मी त्यांना म्हटलं "दालोबोच्या पाठीवरून खालीं उतरा !" भाऊ चटकन खालीं उतरला. त्याची बहीणही खालीं उतरली. पण भाऊच्या कमेर-भोवतीं तिनें आपल्या हाताचा विळखा अजुनही ठेवला होता.

भाऊला मी विचारलं—'ही मला घाबरते कां ?"

'छे—छे—पण कांहीं झालं तरी ती मुलगी आहे.

मग मी नाहीं वाटतं मुलगी ? मी कुठें घाबरतें ? हो, पण थोड्या वेळांपूर्वीं मी फार घाबरलें होतें. मला वाटलं दालोबो माझ्या जादूच्या दगडांतून आला.

भाऊ आश्चर्यानें म्हणाला—जादूचा दगड !

'हो, मी जादूचा दगड घासला. त्याबरोबर दालोबो आणि तुम्हीं दोघं मला दिसलांत.'

"छे आम्हीं याच बाजूला येत होतों. आज शेत नांगरून झाल्यावर, बाबांनीं मला दालोबो घेऊन बाहेर

जायला सांगितलं. इथं गवत चांगलं मिळतं म्हणून आम्हीं इथें आलों.

'मग हा जादूचा दगड नसेल कदाचित !'

तूं परत घास ना तो जमिनीवर ? भाऊ म्हणाला.

मी नाहीं तूं घास ना ! आम्ही दोघेंही घाबरलों होतों थोडेसें.

'तुला भिती वाटतां कामा नये, कारणं तूं कांहीं-झालं तरी मुलगा आहेस.' भाऊ पुढें आला. त्याच्या बहिणीचे हात अजूनही त्याच्या कमरेभोंवतीं होते" अे ताईटले, सोड जरा हात तुझे. असं म्हणून त्यानं रागानं तिला दूर केली. लहान ताई बिचारी ती. तिचे डोळे पाण्यानें भरले. 'भाऊ ! मी म्हटलें, ती लहान आहे रे, रागें नको भरूं तिला !' पण त्याचं लक्ष होतं जादूच्या दगडाकडे. हं–चल आपण हा दगड घासूया जमिनीवर. काय म्हणायचं !

'जादू मंतर फूऽऽ....!' मी म्हटलें

'काय? भाऊ म्हणाला.

'हा जादूचा शब्द आहे !'

‘ पण हा तर परदेशांतला शब्द आहे. मी नाहीं म्हणणार हे. भाऊ म्हणाला.

“ छे. छे. हा परदेशांतला शब्द नाहीं. जादूचा शब्द आहे. हे बघ मी तुला जमिनीवर लिहून दाखविते. मग जमीन हातानं साफ करून मी गवताच्या काडीनें लिहिलं—‘ जादू मंतर फूऽऽऽ ! ’

‘ पण भाऊ म्हणाला मला हें वाचतां येत नाहीं. मी कधीं शाळेंत गेलों नाहीं. पण हीं अक्षरं कांहीं चिनीभाषेंतलीं दिसत नाहींत. आपण नाहीं बुवा म्हणणार हा शब्द. ! ’

‘ तुझी इच्छा ! ’ मी म्हटलं.

थोडा वेळ भाऊनें विचार केला. मग तो म्हणाला. ‘ मी हा दगड घेऊन घरीं जातों. आज रात्रीं मी विचार करीन, आणि उद्यां सायंकाळीं मी इथें येईन. तूं जरूर ये हं. ’

मग भाऊनं तो दगड कमरेला बांधलेल्या पट्ट्यांत ठेवून दिला, आणि दालोबोला हाक मारली. दालोबो बाजूला चरत होता. भाऊनें हुकूम केला—‘ मान

खालीं—! ' त्याबरोबर दालोबोनें मान खाली केली. मग भाऊनें त्याचीं शिंगं दोन्हीं हातांनीं धरलीं आणि टुणकन उडी मारून तो त्याच्या पाठीवर बसला. छोट्या बहिणीनें दालोबोची शेपटी धरली आणि ती त्याच्या पाठीवर चढली.

मग उद्यां सायंकाळीं नक्की ये हं? भाऊ म्हणाला.

नक्की. खरेंच नक्की येईन. मी म्हटलं.

छोट्या बहिणीनें दालोबोची शेपटी हातांत घेतली आणि जोरानें ओढली. त्याबरोबर दालोबो चालू लागला.

आई थांबली. पुढची गोष्ट तिला आठवत नसावी.

" आई ! प्रभा म्हणाला—

' आई थांबलीस कां ? बेबीनं विचारलं.

आई हसत होती.

' मग त्या जादूच्या दगडाचं काय झालं ? प्रभानें विचारलें.

सांग ना आई पुढें ? विनू अधिर होऊन म्हणाला.

" तो पांढरा दगड जादूचा होता कीं नाहीं ते

मलासुद्धां कळेना. मी घरीं गेलें. पण कुणालाच कांहीं सांगितलं नाहीं. कारण जादूच्या गोष्टीविषयीं आपण दुसऱ्याला सांगितलं कीं, त्या गोष्टींतली जादू खलास. रात्रीं मी झोपेंतून एकदम जागी झाले. सभोवार अंधार पडला होता. देवळांतली घंटा घणऽऽ घणऽ वाजत होती. रात्रीच्यावेळीं देवळांतल्या घंटेचा तो आवाज ऐकून मला भिती वाटली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी लवकर उठले. आंघोळ केली. माझा अभ्यास झटपट केला. आईलासुद्धां नवल वाटलं. काय ग आज अगदी सर्व अभ्यास झटपट उरकलास ? कुठें जायचें आहे कां ?

" अं हं—कुठें नाहीं. मी अगदी आनंदानें हंसून म्हटलें. सायंकाळ केव्हां होते असं मला होऊन गेलं. शेवटीं एकदां सूर्य समोरच्या टेकडीवरून खालीं जाऊं लागला. मी कपडे केले आणि धावतच माझ्या नेहमींच्या जागेकडे जाऊं लागलें. दालोबो आणि तीं बहीणभावंडं आज येणार होतीं. मला फार वेळ बसावं लागलं नाहीं. लवकरच दालोबोवर बसून तीं दोघं

आलीं. भाऊनं आज निळी विजार घातली होती आणि त्याच्या बहिणीनं लाल जाकीट घातलं होतं. कालच्या सारखी ती आज गप्प राहिली नाहीं. 'कसं काय—?' मी हंसत हंसत त्या दोघांना विचारलं. ठीक—भाऊ हंसून म्हणाला.

छोटया बहिणीनं मला विचारलं. तुम्हीं गाईचं दूध आणि चरबी खातां ना ?

गाईचं दूध आम्हांला फार आवडतं. पण गाईची चरबी आम्हीं खात नाहीं. लोणी मात्र आम्ही खातों. पण गाईची चरबी आम्हीं खातों हें तुला कुणी सांगितलं ?

कुणी तरी सांगितलेलं मी ऐकलं आहे.

'साफ खोटं आहे तें. लोणी मात्र छान लागतं हो खायला. तुला आवडतं?

छी ! मला नाहीं बाई आवडत. त्याला घाण येते म्हणतात.

कांहींतरीच काय बोलतेस असं? बोललीस तर मला राग येईल हो' मी म्हटलं.

भाऊनं रागाचा लटका भाव करून 'देऊ कां चापटी

तुला? म्हणून हात वर केला.

मग त्यानें तो पांढरा दगड पाट्यांतून काढून म्हटलं "हा जादूचा दगड आहे"!

"तुला कसं कळलं? मी विचारलें.


भाऊ म्हणाला, "रात्रीं मी हा दगड माझ्या उशा-जवळ ठेवला. मला झोंप आली. थोड्या वेळानें मी उठलों आणि पाहिलं तर बाबांनीं दगड हातांत घेतला होता. काळोखांत हिऱ्यासारखा चम्‌चम् करीत होता. बाबा कितीतरी वेळ दगडाकडे पहात होते. मग त्यांनीं मला सांगितलं. हा दगड नाहीं हं!' नीट जपून ठेव! नक्की हा जादूचा दगड आहे.

मग आतां म्हण ना तूं? ' जादू मंतर फूऽऽ ' मी म्हटलं.

बरं मी जमिनीवर दगड घासतो. पण ' जादूमंतर फूऽ' तूं म्हटलं पाहिजेस.'

बरं बरं! मी म्हटलं आणि त्यानं जादूचा दगड घासला. मी हलक्या आवाजांत म्हटलं 'जादूमंतर फूऽ'

मग काय झालं? मधूनें विचारलं.



" कांहीं झालं नाहीं—एक मधमाशी आमच्या अंगावरून उडून गेली, गवतांतून एक साप सळसळ करीत निघून गेला आणि छोटी बहीण भीतीनं घट्ट डोळे मिटून भाऊच्या बाजूला होती.

" मी म्हटलं " भाऊ आपलं चुकलं. हें बघ, ज्यांनीं दगड घासायचा त्यांनींच ' जादूमंतर फूऽऽ ' म्हटलं पाहिजे.

" हातांतला दगड पुढें करून भाऊ म्हणाला-मग तूंच घे ना दगड आणि म्हण ! ' जादूमंतर फूऽऽ ' !

मी म्हटलं ' अं हं तूंच म्हण '

'बरं तर. आण दगड इथें. पण थोडा विचार करून तो म्हणाला. अे पण जादूचा दगड घासल्यावर जर का राक्षस दिसला तर दालोबो पळेल ना!'

दालोबोला तुझ्या पळतां येतं का? मी हंसून विचारलं.

मग तुम्हांला काय वाटतं बाईसाहेब? एकदां त्यानं एका गोऱ्या माणसाला पाहिल्यावर तो चार मैल पळत सुटला होता! छोटी बहीण म्हणाली.

हो दालोबो घाबरला कीं, जोरात पळत सुटतो भाऊ म्हणाला.

आतां करायचं काय? मोठा बिकट प्रश्न आमच्या समोर आला होता.

भाऊ म्हणाला–हें पहा तूं दालोबोवर बैस. मी पुढें बसेन. तूं मध्यें आाणि ही तुझ्यापाठीमागें बसेल, म्हणजे तुला खाली पडण्याचीहि भीति नको.

भाऊनं कल्पना तर छान काढली होती. मला ती फार आवडली. पहिल्यानें भाऊ दालोबोवर बसला व

मग मी चढूं लागलें, पण दालोबो मला पाठीवर बसूं देईना.

कां ? बेबीनं विचारलं.

कां ? मी त्याच्या ओळखीची नव्हतें. म्हणून दालोबोनें मान उंच केली. आणि तोंडांतलं गवत फुरऽऽफुरऽ करून तो बाहेर फेकूं लागला.

मग भाऊनं त्याच्या मानेवर जोरानें गुद्दे मारले. तशी त्यानं मान खाली केली.आणि मी भाऊच्या हाताला धरून वर चढले. छोटी बहीण माझ्या पाठीमागं बसली. तिचे हात माझ्या कमरेभोवती होते. मी त्यावेळेपर्यंत कधीं पानरेड्यावर बसले नव्हते.

आई थांबली आणि बाबांकडे पाहून हंसू लागली. बाबा पण शांतपणें गोष्ट ऐकत होते.

प्रभानें विचारलं ' पण त्या जादूच्या दगडाचं काय झालं '?

तुम्हीच तें ठरवा. कारण दालोबो मान वळवून मागे पाहात होता. मी भाऊला म्हटलं' मी त्याच्या पाठीवर बसलें आहे हें त्याला आवडत नाहीं ' आणि

त्याचीं हीं शिंगं पहा माझ्या कशी मांडीला रुतत आहेत ?

भाऊ खालीं उतरला आणि दालोबोच्यापुढें उभा राहून म्हणाला. ' अे हं. नीट चालायला लाग, नाहीं तर चांगली गठडी वळवीन !

पण भाऊ तें बोलला त्याबरोबर दालोबोनें अंगाला एकदम जोराचा हिसका दिला.

' भाऊ--आतां परत एकदा जादूचा दगड घास आणि मग जर कांहीं झालं नाहीं तर मी खाली उतरेन. भाऊनें दगड जमिनीवर घासला आणि म्हटलं ' जादू मंतर फू !

मग काय झालं ? विनूनें विचारलें, " सांग ना पुढें ? पण मजा काय झाली ? भाऊला ' जादू मंतर फू ' नीट म्हणतां येत नव्हतं. तो म्हणायचा ' जादू मंतल फू ! चिनी लोकांना ' र ' चा नीट उच्चार करतां येत नाहीं. मी त्याला तोंड जवळ नेऊन जीभ दातांच्या पाठीमागं आणून ' र ' चा उच्चार कसा करतात तें दाखविलें, आणि एकदम भाऊनें दगड

घासून बरोबर उच्चार केला 'जादू मंतर फू ! त्याबरोबर....!

'काय झालं त्याबरोबर ? मधूनें विचारलें. त्या बरोबर दालोबोनें मोठी किंकाळी मारिली आणि तो भरधांव धावत सुटला. डोंगरावरून खडकाळ रस्त्यांतून जिकडे वाट मिळेल तिकडे तो धावूं लागला. भाऊनें त्याच्या गळ्यांत बांधलेली दोरी ओढून त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. भाऊ त्याला शिव्या देऊं लागला. लाथा मारू लागला. पण दालोबो कसला ऐकतो ? तो वेगांत पळत होता. छोटी बहीण आणि मी भीतीनं किंकाळ्या मारीत होतो. धरणीकंपाचे धक्के बसत आहेत असं मला वाटलं. कधीं एकदां दालोबो थांबतो असं आम्हांला झालं. शेवटीं दालोबो त्याची एक आवडती जागा होती तिथें बसला.

"त्याची ती आवडती जागा म्हणजे टेकडीच्या बाजूला एक लहानसं तळं होतं तिकडे दालोबोला पळतांना पाहून आमच्या छातींत धडकीच भरली. पण

करणार काय ? एकमेकांला आम्ही घट्ट बिलगलें आणि दुसऱ्याच क्षणाला दालोबोनें तळयांत उडी मारली. चिखलानें आमचीं सर्वांचीं अंगं माखलीं. आमच्या गळ्यापर्यंत पाणी होतं पण आम्ही तिघंही अजून दालोबोच्या पाठीवरच होतों. दालोबोचं सारं अंग पाण्यांत होतं. फक्त त्याचं जाडंभरडं काळं नाक तेवढं पाण्याबाहेर होतं.

" दालोबोनें पाण्यांत उडी मारली. तेव्हां मोठा आवाज झाला. शेजारच्या शेतांत माणसं काम करीत होतीं. त्यांनीं तो आवाज ऐकला आणि ते सारे लोक धावून आले. भाऊचे आणि छोटया बहिणीचे वडीलही त्यांत होते. ते पहिल्यानें आले. त्यांचं नांव चँग, हे मी तुम्हांला पहिल्यानंच सांगितलं आहे. चँगनीं आम्हांला बाहेर काढलं.

" मला त्यांनीं विचारलें. दालोबो एवढा भरधाव धावत का सुटला ?

भाऊ म्हणाला, जादूच्या दगडामुळें ?

' कसला जादूचा दगड ? '

'काल तुम्ही रात्रीं पाहिला नाहीं माझ्या उशाजवळ?'
कुठं आहे तो ? चँग म्हणाले.

' आम्ही तिघे एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागलों. पण जादूचा दगड होता कुठें ? भाऊ म्हणाला ! माझ्या हातांत होता पण. !

' तुझ्या हातांतून तो पडला असेल. रस्त्यांत चँग म्हणाले.

मी भाऊकडे करुण नजरेनें पाहिलें. त्याला पण वाईट वाटत होतं. पण आतां काय त्याचा उपयोग होता ?

चँगनीं म्हटलं. 'मधमाशी चावली असेल दालोबोला किंवा सर्प दिसला असेल. त्याशिवाय इतक्या जोरानें पळणार नाहीं तो."

' हो. मधमाशी आणि सर्पसुध्दां गेला खरा एक आमच्या बाजूनें. मी म्हटलं.

' हं तेव्हांच. चँग म्हणाले. बरं पण तुम्ही आतां घरीं जाऊन कपडे बदला पाहूं. तोंपर्यंत मी दालोबोला

तळ्यांतून बाहेर काढतो. नाहींतर तो चिखलांतच बसून राहील.

मग त्यांनीं एक मोठी काठी घेतली आणि तळ्याच्या काठावर जाऊन दालोबोला ते बाहेर काढूं लागले, पण दालोबो कांहीं बाहेर येईना. भाऊ आणि छोटी बहीण ओल्या कपड्यानें घरीं चालली होतीं. मी पण ओल्या कपड्यानें आमच्या टेकडीवरच्या घराकडे चालू लागलें. मी आमच्या घराजवळ आले आणि मागे वळून पाहिलं तर चँग दालोबोच्या गळ्यांत दोरी बांधून त्याला घराकडे घेऊन चालले होते. आईला आतां, मला सगळी हकीगत सांगावी लागणार होती. कारण माझे ओले कपडे पाहून मला तिनं विचारलं. मधु एकदम म्हणाला. काय काय विचारलं?

कारण मधूला नेहमीं पाण्यांत भिजायची संवय होती. आणि त्याला पाण्यांत भिजलेला पाहिला कीं, आई म्हणायची ‘ मधू तुझ्यापुढें आतां काय करावं तें कळत नाहीं !’

“ आई पुढें सांगूं लागली. मला तश्या ओल्याचिंब कपड्यांत पाहून आई म्हणाली ‘ आतां तुझ्यापुढें काय करावं तें कळत नाहीं ’ ! आईचं तें वाक्य ऐकून सगळीजणं हसूं लागलीं.



थोडा वेळ सर्व जण गप्प बसलीं. पण बेबीनं विचारलें ‘ पण आई त्या जादूच्या दगडाचं काय झालं ? ’

आईनें हवेंत हात वर केले आणि म्हटलं, 'मला काय माहीत ! कुणालाच तें कळलं नाहीं. दालोबोला कदाचित माहित असेल. पण त्याला बोलतां कुठं येत होतं !'

---

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. 24932 नों. दि ............
वि. बा.:वा ...... क्र. ............